ePaper
दक्षिण चीन समुद्रात दुतर्फा अडकला ड्रॅगन, भारताने घाबरवलं



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™



पान 3 वरुन...

वायसीएममधील दातांची एक्सरे मशीन बंद

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 03 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## इस्रायलमुळे शांतता चर्चा धोक्यात, युद्धाचा धोका अधिकच वाढला

# इराणने अमेरिकेशी सर्व संबंध तोडले!

महाईन्यूज । तेहरान

**मध्यपूर्वेतील संघर्ष थांबवण्यासाठी सुरू असलेल्या शांतता प्रयत्नांना मोठा धक्का बसला आहे. लेबनॉनमधील इस्रायलच्या लष्करी कारवायांवर संताप व्यक्त करत इराणने अमेरिकेसोबत सुरू असलेल्या सर्व चर्चा आणि राजनैतिक संपर्क तूर्तास स्थगित करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे आधीच तणावपूर्ण असलेल्या परिस्थितीत आणखी चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



इराणची निम-शासकीय वृत्तसंस्था तस्नीमच्या वृत्तानुसार, गाझा आणि लेबनॉनमधील इस्रायली हल्ले पूर्णपणे थांबेपर्यंत अमेरिकेसोबत कोणतीही चर्चा होणार नाही, अशी ठाम भूमिका तेहरानने घेतली आहे. तसेच होर्मुझ सामुद्रधुनी आणि बाब-अल-मंदेब जलमार्ग बंद करण्यासह इस्रायलविरोधात आणखी कठोर पावले उचलण्याचाही इशारा इराणने दिला आहे. यामुळे जागतिक इंधन पुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केल्याचे सांगितले. ट्रम्प यांच्या मते, संघर्ष कमी करण्याबाबत सकारात्मक संकेत मिळाले आहेत. मात्र, नेतन्याहू यांनी दक्षिण लेबनॉनमधील लष्करी कारवाया सुरूच राहतील, असे स्पष्ट केल्याने शांतता प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याचवेळी इस्रायली सैन्याने दक्षिण लेबनॉनमधील महत्त्वाचा ब्युफोर्ट किल्ला ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. गेल्या दोन दशकांतील ही सर्वात मोठी घुसखोरी मानली जात असून अनेक अरब राष्ट्रांसह फ्रान्स, जर्मनी आणि ब्रिटननेही या कारवाईचा निषेध केला आहे.

इराणच्या लष्कराने बैरूतवरील हल्ले सुरू राहिल्यास उत्तर इस्रायल रिकामे करण्याचा थेट इशाराही दिला आहे. त्यामुळे मध्यपूर्वेतील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

एकीकडे अमेरिका युद्धविरामासाठी प्रयत्न करत असताना दुसरीकडे इस्रायलची आक्रमक भूमिका कायम असल्याने शांतता प्रयत्नांना धक्का बसत आहे. परिणामी, संपूर्ण प्रदेशात व्यापक युद्धाचा धोका आणखी वाढल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

### सद्यपरिस्थिती काय?

इराणने अमेरिकेसोबतच्या सर्व चर्चा स्थगित करत इस्रायलने गाझा व लेबनॉनमधील लष्करी कारवाया थांबवल्याशिवाय कोणतीही वाटाघाटी होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. दुसरीकडे, इस्रायलने दक्षिण लेबनॉनमधील कारवाया सुरूच ठेवण्याची भूमिका घेतली असून इराणनेही कठोर प्रत्युत्तराचा इशारा दिला आहे. त्यामुळे मध्यपूर्वेतील तणाव अधिक वाढला असून व्यापक युद्धाची शक्यता बळावली आहे.

### इराणचाही इस्रायला थेट इशारा

दरम्यान, इस्रायली सैन्याने दक्षिण लेबनॉनमधील धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा असलेला ब्युफोर्ट किल्लाही ताब्यात घेतला आहे. इस्लायलची ही गेल्या दोन दशकांतील सर्वात मोठी घुसखोरी मानली जात असून; अरब देशांसह फ्रान्स, जर्मनी आणि ब्रिटनने या कारवाईचा तीव्र निषेध केला आहे. त्यातच इराणच्या लष्कराने बैरूतवर हल्ले सुरू राहिल्यास उत्तर इस्रायल रिकामे करण्याचा थेट इशारा दिला आहे.

### युद्धाचा धोका अधिकच वाढला

तसेच एकीकडे अमेरिका शांतता चर्चा यशस्वी होण्यासाठी आणि युद्ध थांबवण्यासाठी प्रचंड प्रयत्न करत आहेत. मात्र, दुसरीकडे त्यांचा मित्र देश इस्रायल, इराणमधील लेबॅनॉनवरील हल्ले थांबवण्याचे नाव घेत नाही आहेत. इस्रायलचा हा हट्टीपणा अमेरिकेच्या प्रयत्नात सर्वात मोठा अडथळा निर्माण करत असल्याचे चित्र उभे राहिले आहे. यामुळे युद्धाचा धोका आता सर्वाधिक वाढला आहे.

### इस्रायलची लेबनॉनमधील लष्करी कारवाई सुरूच राहणार

यावेळी डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्याशी फोनवर चर्चा केल्याची माहितीही समोर आली आहे. ट्रम्प यांच्या मते, इस्रायल त्यांचे सैन्य बैरूतमध्ये पाठवणार नाही आणि दोन्ही बाजूंनी युद्ध थांबवण्यास संमती दिली आहे. लेबनॉन सरकारनेही हिजबुल्लाह अमेरिकेच्या शांतता प्रस्तावावर तयार असल्याचे म्हटले आहे. पण ट्रम्प यांचा या दाव्यात नेमकी किती सत्यता आहे हे सांगणे कठीण आहे कारण, नेतन्याहू यांनी ट्रम्प यांच्या दाव्याच्या उलट भूमिका घेत इस्रायलची भूमिका बदललेली नाही आणि दक्षिण लेबनॉनमधील लष्करी कारवाया सुरूच राहतील, असे स्पष्ट केले.



# पुणेकरांची फक्त टँकरवर भिस्त!

## प्रशासनाचे मोठे अपयश: पुणे जिल्ह्यात १०४ टँकरद्वारे पाणीपुरवठा

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे जिल्ह्यातील पाणीटंचाईच्या झळा तीव्र होण्यास सुरुवात झाली असून, एकूण १०४ टँकरद्वारे १११ गावे आणि ४२६ वाड्यांतील सुमारे पावणेदोन लाख लोकसंख्येला पाणीपुरवठा केला जात आहे. आंबेगाव, जुन्नर, खेड, शिरूर आणि पुरंदर तालुक्यात सर्वाधिक पाणीटंचाई असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. दरम्यान, 'एल-निनो'च्या प्रभावामुळे पावसाचे आगमन उशिरा झाल्यास टँकरची संख्याही वाढण्याची शक्यता असून, जिल्हा प्रशासनाकडून ८७ विहिरींचे संपादन करण्यात आले आहे.**




जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर, खेड, शिरूर आणि पुरंदर या तालुक्यांतील १११ गावे आणि ४२६ वाड्यांमध्ये पाणीटंचाई भासत असून, एकूण नऊ तालुक्यांतील १ लाख ७३ हजार ५२९ नागरिकांना गेल्या आठवड्यापर्यंत १०४ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. ही संख्या काही प्रमाणात वाढली असून, ती पावणेदोन लाखांपर्यंत पोहोचल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. तसेच, ३०३० पशुधनाला ही टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्ती आणि देखभालीच्या कामांनाही वेग देण्यात आला आहे. त्यासाठी ४३ पाणीपुरवठा योजना दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून, पाच कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

'ग्रामीण भागात पाणीपुरवठ्यासाठी २.५६ कोटी रुपयांचा खर्च करून ६११ कूपनलिकांच्या (बोअरवेल) दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. ग्रामीण भागातील वाढती पाणीटंचाई लक्षात घेऊन ३१ नवीन कूपनलिकांच्या कामांनाही मंजुरी देण्यात आली आहे. त्यासाठी २५.३५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

**तालुका – टँकर संख्या – लोकसंख्या**

**आंबेगाव** – २५ – ३९,५०७
**भोर** – ०८ – १३,६८६
**दौंड** – ०१ – १,६००
**हवेली** – ०८ – ७,१०९
**इंदापूर** – ०६ – २०,५०३
**जुन्नर** – २० – २३,९८१
**खेड** – १४ – २७,४५८
**पुरंदर** – १० – १३,६६०
**शिरूर** – १२ – २६,०८८
**एकूण** – १०४ – १,७३,५२९

### सव्वातीन लाख लोकसंख्येला पाणीपुरवठा

विभागातील पुण्यासह, सातारा, सांगली,कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यातील सव्वातीन लाख लोकसंख्येला २०० टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये २०८ गावे आणि ७७६ वाड्या-वस्त्यांचा समावेश असल्याची माहिती विभागीय आयुक्त कार्यालयाकडून देण्यात आली. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी विभागातील १६८ विहिरी आणि कूपनलिका अधिग्रहीत केल्या आहेत. सातारा जिल्ह्यात ६२ आणि सांगली जिल्ह्यातील १९ खासगी विहिरी जिल्हा प्रशासनाकडून ताब्यात घेतल्या आहेत. सातारा जिल्ह्यात ८२ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

# पुण्यात प्रधानमंत्री आवास योजना सदनिकांचा गैरवापर!

**महाईन्यूज । पुणे**

**आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना हक्काचे छत्र पंतप्रधान आवास योजनेच्या सदनिकांचा पुण्यात व्यावसायिक गैरवापर सुरू आहे. या सदनिका भाड्याने देणे नियमबाह्य असताना देखील वडगाव खुर्द येथील सिंहगड पीएमएवाय गृहनिर्माण सोसायटीमध्ये नियमांना केराची टोपली दाखवत सुमारे 100 ते 150 सदनिका बेकायदेशीरपणे भाडेतत्त्वावर आहेत. विशेष म्हणजे, महापालिकेने सोसायटीला नोटीस बजावूनही अनधिकृत भाडेकरूंचा राबता कायम आहे.**

महापालिकेच्या नियमांनुसार आणि लाभार्थी-महापालिका यांच्यातील अधिकृत करारनाम्यानुसार, पीएमएवाय अंतर्गत मिळालेली घरे कोणत्याही परिस्थितीत हस्तांतरित करणे, विकणे किंवा भाड्याने देणे बेकायदेशीर आहे. असे असतानाही, या सोसायटीत नियम धाब्यावर बसवून थेट सोसायटीच्या मुख्य प्रवेशद्वारावर आणि सोशल मीडिया, तसेच व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर सदनिका भाड्याने देण्याच्या जाहिराती उघडपणे फिरत आहेत. या योजनेअंतर्गत सदनिका मिळालेल्या लाभार्थ्यांनी त्यांच्या सदनिकांमध्ये नियमबाह्य भाडेकरू ठेवून सदनिकांचा व्यावसायिक उपयोग सुरू केला आहे.

महापालिकेच्या पंतप्रधान आवास योजना विभागाने तपासणीत हा प्रकार उघडकीस आणल्यानंतर 23 जुलै 2024 रोजी सोसायटी व्यवस्थापनाला अधिकृत नोटीस बजावली होती. या नोटीशीमध्ये आठ दिवसांच्या आत सर्व अनधिकृत भाडेकरूंना बाहेर काढून सदनिका रिकाम्या करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, या नोटिशीची मुदत उलटून प्रदीर्घ काळ झाला, तरी एकाही भाडेकरूवर कारवाई झालेली नाही. यानंतर स्थानिक रहिवाश्यांच्या तक्रारीनुसार गेल्या महिन्यात 21 मे रोजी पुन्हा महापालिकेने नोटीस बजावत कारवाईचा इशारा दिला होता. या नोटीसला देखील आठ दिवस उलटले असून अद्यापही कारवाई करण्यात आलेली नाही.




### रहिवाशांचा आरोप काय?

या गृहनिर्माण प्रकल्पात एकूण सुमारे 1,100 सदनिका आहेत. त्यापैकी सुमारे 100 ते 150 सदनिकांमध्ये अनधिकृत भाडेकरूंचे वास्तव्य असल्याचे तपासणीत समोर आले आहे. या अनधिकृत भाडेकरूंच्या वाढत्या संख्येमुळे सोसायटीच्या मूळ रहिवाशांमध्ये सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यामध्ये सोसायटी कमिटीच्याही भूमिकेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. कमिटीच्याच छुप्या पाठिंब्यामुळे हे भाडेकरू गृहप्रकल्पात ठाण मांडून असल्याचा आरोप मूळ रहिवाशांनी केला आहे.

# वायसीएममधील दातांची एक्सरे मशीन बंद

## रुग्णांची गैरसोय वाढली; गोरगरीब रुग्णांना बाहेरून एक्सरे काढावा लागत असल्याने संताप

**महाईन्यूज ।** पिंपरी-चिंचवड

**यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातील दातांचा एक्सरे काढणारी मशीन गेल्या काही दिवसांपासून बंद असल्याने रुग्णांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. परिणामी, दंत उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना खासगी केंद्रांमध्ये जाऊन एक्सरे काढावा लागत असून अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे.**



वायसीएम रुग्णालयात पिंपरी-चिंचवडसह तळेगाव, वडगाव मावळ, मळवली, आळंदी, वाघोली आदी भागांतील हजारो नागरिक उपचारासाठी येतात. मात्र, दंत विभागातील महत्त्वाची एक्सरे मशीन बंद असल्याने उपचार प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत. अनेक रुग्ण व नातेवाईकांनी याबाबत प्रशासनाकडे तक्रारी केल्या असल्या तरी अद्याप ठोस उपाययोजना झालेली नाही.

माहितीनुसार, गेल्या वर्षभरात ही मशीन अनेक वेळा बंद पडली असून तिच्या दुरुस्तीसाठी लाखो रुपये खर्च करण्यात आले आहेत. तरीही समस्या कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. वारंवार दुरुस्ती करण्याऐवजी नवीन मशीन खरेदी करण्याची मागणी जोर धरत आहे.

रुग्णालयात दंतोपचार विभाग कार्यरत असला तरी प्रामुख्याने दात काढणे आणि जबड्यावरील शस्त्रक्रिया यांसारख्या सेवा दिल्या जातात. मात्र, रूट कॅनलसारखे सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक असलेले उपचार उपलब्ध नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे अनेकांना खासगी दवाखान्यांचा पर्याय निवडावा लागत आहे.

नागरिकांच्या मते, पंतप्रधान स्वास्थ्य योजनेंतर्गत उपलब्ध निधीतून नवीन दंत एक्सरे मशीन खरेदी करणे अपेक्षित होते. मात्र, त्याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली दिसत नाही. त्यामुळे महापालिका व वायसीएम प्रशासनाने तातडीने नवीन मशीन उपलब्ध करून दंत विभागातील सुविधा सक्षम कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### वारंवार बिघाड, रुग्णांना फटका


वायसीएम रुग्णालयातील दंत एक्सरे मशीन वर्षभरात अनेक वेळा बंद पडल्याने रुग्णांना खासगी केंद्रांमध्ये जाऊन तपासणी करावी लागत आहे. वारंवार दुरुस्तीसाठी खर्च करण्यापेक्षा नवीन मशीन खरेदी करून कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

> “ आता रुग्णांच्या सेवेसाठी एक्सरे मशिन नवीन बसविले आहे. तरी हे मशिन पुढील आठवड्यात पूर्ण क्षमतेने सुरू होईल. उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची गैरसोय दूर करण्यात येईल.
> - **डॉ. राजेश वाबळे,** अधिष्ठाता, वायसीएम रुग्णालय, पिंपरी.

# पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा! ९२% नाले सफाई पूर्ण

**महाईन्यूज ।** पिंपरी-चिंचवड

**आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातील नाले सफाई मोहिमेला वेग आला असून, महापालिकेने हाती घेतलेल्या कामांपैकी तब्बल ९२.३३ टक्के काम पूर्ण झाले आहे. शहरात पावसाचे पाणी तुंबणे, साचलेला गाळ आणि स्थानिक पूरस्थिती टाळण्यासाठी प्रशासनाने मोहिम राबवली. सध्या नाले सफाईची कामे अंतिम टप्प्यात पोहोचली आहेत.**



महापालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांमार्फत मार्च महिन्यापासून नाले सफाई मोहीम सुरू करण्यात आली होती. शहरातील एकूण १४१ नाले आणि ९४ हजार ९१३ मीटर लांबीच्या नाल्यांची साफसफाई हाती घेण्यात आली आहे. सुरुवातीला १६ मार्च रोजी केवळ ५.०४ टक्के प्रगती नोंदवली गेली होती. मात्र एप्रिल आणि मे महिन्यात कामांना गती देण्यात आल्याने २५ मेपर्यंत ८५.८४ टक्के काम पूर्ण झाले आणि १ जून अखेर ही प्रगती ९२.३३ टक्क्यांवर पोहोचली आहे.

क्षेत्रीय कार्यालयनिहाय पाहता काही विभागांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. 'ग' क्षेत्रीय कार्यालयाने १०० टक्के नाले सफाई पूर्ण करत आघाडी घेतली असून, 'फ' विभागात ९९.६१ टक्के तर 'ई' विभागात ९८.४४ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित विभागांमधील साफसफाईची कामेही अंतिम टप्प्यात असून पावसाळा सुरू होण्यापूर्वी संपूर्ण शहरातील नाले स्वच्छ करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे.

दरवर्षी पावसाळ्यात नाल्यांमध्ये साचणारा गाळ, प्लास्टिक व इतर कचऱ्यामुळे पाण्याचा प्रवाह अडतो आणि अनेक भागांत पाणी तुंबण्याच्या घटना घडतात. काही ठिकाणी स्थानिक पूरस्थितीही निर्माण होते. ही बाब लक्षात घेऊन यंदा महापालिकेने नाले सफाईचे नियोजन अधिक काटेकोर केले असून, संवेदनशील आणि पाणी साचण्याची शक्यता असलेल्या भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले की, नाले सफाईची कामे केवळ प्रमाणावर न पाहता गुणवत्तेच्या निकषांवरही तपासली जात आहेत. नाल्यांमधून काढलेला गाळ आणि कचरा तातडीने उचलून त्याची विल्हेवाट लावली जात आहे. तसेच पावसाळ्यात समस्या निर्माण होऊ शकणाऱ्या संवेदनशील भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

महापालिकेकडून सुरू असलेल्या या मोहिमेमुळे यंदाच्या पावसाळ्यात शहरातील महापालिकेकडून सुरू असलेल्या या व्यापक नाले सफाई मोहिमेमुळे यंदाच्या पावसाळ्यात शहरातील जलनिस्सारण व्यवस्था अधिक सक्षम आणि सुरळीत राहण्यास मदत होणार असून, पाणी तुंबणे व स्थानिक पूरस्थितीच्या घटनांमध्ये लक्षणीय घट होईल, असे महापालिका प्रशासनाने सांगितले आहे.

### नाले सफाईला वेग; प्रशासन सज्ज

मार्चपासून सुरू असलेल्या नाले सफाई मोहिमेत महापालिकेने मोठी प्रगती साधली आहे. १ जूनअखेर ९२.३३ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामे अंतिम टप्प्यात आहेत. पावसाळ्यापूर्वी सर्व नाले स्वच्छ करून शहरातील जलनिस्सारण व्यवस्था सक्षम करण्यासाठी प्रशासनाकडून युद्धपातळीवर काम सुरू आहे.

### पावसाळ्यात पाणी तुंबणार नाही?

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील १४१ नाल्यांच्या सफाईपैकी ९२.३३ टक्के काम पूर्ण केले आहे. नाल्यांमधील गाळ, प्लास्टिक व कचरा हटवून जलप्रवाह सुरळीत करण्यावर भर देण्यात आला आहे. संवेदनशील भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आल्याने यंदाच्या पावसाळ्यात पाणी तुंबणे व स्थानिक पूरस्थितीच्या घटनांमध्ये घट होण्याची अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली आहे.



## भूमिका

**पिंपरी-चिंचवड आणि पुणे परिसरात विषारी हातभट्टीच्या दारूमुळे झालेल्या मृत्यूंनी महाराष्ट्राला हादरवून सोडले आहे. फुगेवाडी आणि हडपसर परिसरात घडलेल्या या दुर्घटनेत अनेक निष्पाप जीव गेले, तर काही जण मृत्यूशी झुंज देत आहेत. ही घटना केवळ विषारी दारूची नाही, तर प्रशासनाच्या निष्क्रियतेची आणि भ्रष्ट व्यवस्थेचीही आहे**

# पोरासोरांना अड्डे माहीत, पोलिसांना का नाही?



हातभट्टीची दारू तयार करणे, त्यात मिथेनॉलसारखे घातक रसायन मिसळणे, त्याची वाहतूक आणि विक्री करणे ही प्रक्रिया एका दिवसात उभी राहत नाही.

यामागे मोठी आणि संघटित साखळी कार्यरत असते. स्थानिक नागरिकांना, अगदी गल्लीतील तरुणांनाही असे अड्डे माहीत असतात. मग पोलिसांना आणि उत्पादन शुल्क विभागाला ते दिसत नाहीत का, हा प्रश्न सर्वसामान्यांना पडणे स्वाभाविक आहे. प्रत्यक्षात या अवैध धंद्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते, अशी भावना समाजात निर्माण झाली आहे.

या प्रकरणात काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झाली असली, तरी ती पुरेशी नाही. कारण अशा दुर्घटना वारंवार घडण्यामागे केवळ दारू माफिया नव्हे, तर त्यांना मिळणारे संरक्षणही कारणीभूत असते.

जर संबंधित यंत्रणांनी वेळेवर कारवाई केली असती, तर अनेक कुटुंबांवर ओढवलेले दुःख टाळता आले असते. या दुर्घटनेची सर्वांत वेदनादायक बाजू म्हणजे मृत्यूमुखी पडलेले बहुतेक लोक हे गरीब, कष्टकरी आणि रोजंदारीवर उदरनिर्वाह करणारे होते. स्वस्तात नशा मिळते म्हणून त्यांनी ही दारू घेतली; मात्र त्याची किंमत त्यांना जीव गमावून चुकवावी लागली.

त्यांच्या मृत्यूनंतर कुटुंबांवर उपासमारीची वेळ येते, लहान मुले पोरकी होतात आणि संपूर्ण संसार उद्ध्वस्त होतो. काही दिवस बातम्या झळकतात, चर्चा होते आणि नंतर सर्व काही विस्मरणात जाते. मात्र त्या कुटुंबांचे दुःख कायम राहते.

सरकारने नुकसानभरपाई जाहीर केली आहे, परंतु पैशाने जीव परत मिळत नाही. त्यामुळे केवळ आर्थिक मदत देऊन जबाबदारी संपत नाही. या प्रकरणातील मुख्य आरोपींसह त्यांना मदत करणारे आणि संरक्षण देणारे सर्व घटक शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे.

तसेच निलंबनापुरती कारवाई न करता दोषी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे.

विषारी दारूची ही शोकांतिका समाज आणि प्रशासन दोघांसाठीही धोक्याची घंटा आहे. गरीबांचा जीव स्वस्त समजण्याची मानसिकता बदलली नाही आणि अवैध धंद्यांना मिळणारे संरक्षण थांबले नाही, तर अशा घटना पुन्हा घडतील.

त्यामुळे या प्रकरणातील सत्य बाहेर आणणे, दोषींना शिक्षा करणे आणि अवैध दारू व्यवसायाचे संपूर्ण उच्चाटन करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा या मृत्यूंसाठी केवळ दारू माफिया नव्हे, तर त्यांच्याकडे सोयीस्कर डोळेझाक करणारी संपूर्ण व्यवस्था जबाबदार ठरेल.

## प्रासंगिक »

### भगवान

**एका फकिराला एकदा स्वप्न पडले की तो स्वर्गात गेला आहे. तेथे मोठी गर्दी जमलेली होती. चौकशी केल्यावर त्याला समजले की आज भगवानांचा जन्मदिन असून ते येथून जाणार आहेत.**

फकिरा आनंदित झाला. थोड्या वेळाने घोड्यावरून एक तेजस्वी पुरुष आला. त्याच्यामागे हजारो लोक होते. फकिराने विचारले, “हेच भगवान का?” उत्तर मिळाले, “नाही, हे राम आहेत.” त्यानंतर येशू, बुद्ध, महावीर असे अनेक महापुरुष आले आणि त्यांच्या मागेही असंख्य अनुयायी होते.रात्र झाली, गर्दी विरळ झाली. अखेर एक वृद्ध माणूस एकटाच त्या रस्त्याने येताना दिसला. फकिराने विचारले, “आपणच भगवान आहात का?” वृद्धाने होकार दिला. आश्चर्यचकित होऊन फकिराने विचारले, “मग आपल्या मागे कोणीच का नाही?” भगवानांच्या डोळ्यांत अश्रू आले. ते म्हणाले, “सारेजण राम, बुद्ध, महावीर, येशू यांच्यामागे गेले. जो कोणाच्याही मागे अंधपणे जात नाही, सत्याचा स्वतः शोध घेतो, तोच माझ्याबरोबर येऊ शकतो.”

- तात्पर्य : महापुरुषांचा आदर करावा, पण अंधानुकरण करू नये. सत्य, विवेक आणि आत्मज्ञानाचा शोध स्वतःच्या विचारांनी घेतल्यासच परमेश्वराची खरी अनुभूती मिळते.

दिल्ली पोलिसांनी अलीकडेच पाकिस्तानची गुप्तहेर संस्था आयएसआय आणि दाऊद इब्राहिमच्या टोळीशी संबंधित नऊ संशयितांना अटक करून देशावरील मोठे दहशतवादी संकट टाळले.

# दहशतवादाच्या सावटाखालील सुरक्षा आव्हान



मुंबई, दिल्लीसह देशातील महत्त्वाच्या ठिकाणांवर हल्ले घडवून आणण्याचा कट उधळण्यात सुरक्षा यंत्रणांना यश आले. या घटनेमुळे भारताविरोधातील दहशतवादी कारवाया अद्याप संपलेल्या नसून देश सतत सावध राहण्याची गरज असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी, तर दिल्ली ही राजकीय राजधानी आहे. या दोन्ही शहरांवर यापूर्वी अनेकदा दहशतवादी हल्ले झाले आहेत. संसद भवनावरील हल्ला आणि २६/११ चा मुंबईवरील हल्ला आजही देशाच्या स्मरणात आहे. त्यामुळे या शहरांची सुरक्षा ही राष्ट्रीय सुरक्षेचा महत्त्वाचा भाग आहे. अलीकडील कारवाईत संशयितांच्या ताब्यातून संवेदनशील ठिकाणांची माहिती मिळाल्याने दहशतवादी संघटना अजूनही भारतातील महत्त्वाच्या शहरांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

भारताची वाढती आर्थिक आणि सामरिक ताकद काही शक्तींना अस्वस्थ करणारी ठरत आहे. देश विकासाच्या मार्गावर वेगाने पुढे जात असताना अस्थिरता निर्माण करण्यासाठी दहशतवादाचा वापर करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अशा परिस्थितीत गुप्तचर यंत्रणा, पोलीस आणि सुरक्षा दलांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते.

वेळेवर मिळालेली माहिती आणि तत्पर कारवाईमुळे अनेक संभाव्य संकटे टाळली जाऊ शकतात. दहशतवादाविरोधातील लढा केवळ सुरक्षा दलांपुरता मर्यादित नाही.

नागरिकांनीही सतर्क राहून संशयास्पद हालचालींची माहिती प्रशासनाला देणे आवश्यक आहे. समाजातील काही तरुणांना पैशांचे किंवा इतर आमिष दाखवून दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी करण्याचे प्रयत्न होत असल्याने सामाजिक जागरूकताही तितकीच महत्त्वाची आहे.

देशाच्या सुरक्षेला आव्हान देणाऱ्या शक्तींविरोधात कठोर कारवाई, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि सुरक्षा यंत्रणांमधील समन्वय अधिक मजबूत करणे ही काळाची गरज आहे. भारताची शांतता, स्थैर्य आणि प्रगती अबाधित राखण्यासाठी दहशतवादाविरोधातील लढा सातत्याने आणि अधिक प्रभावीपणे सुरू ठेवणे आवश्यक आहे. सुरक्षित आणि सक्षम भारतासाठी हीच सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



क्षणभरी आम्ही सोसिलें वाईट ।
साधिलें अवीट निजसुख ॥१॥

सांडी मांडी मागें केल्या भरोवरी ।
अधिक चि परी दुःखाचिया॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मराठा आंदोलन: मृतांच्या वारसांना सरकारी नोकरी!

## शासकीय आदेश जारी : मराठा आंदोलक मनोज जरांगे म्हणतात..'मी समाधानी नाही!'

**महाईन्यूज । मुंबई**

**मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या आंदोलकांच्या वारसांना एमआयडीसीमध्ये (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) नोकरी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने घेतला आहे. अंतरवाली सराटी येथील आंदोलनादरम्यान दिलेल्या आश्वासनाची पूर्तता या निर्णयातून झाल्याचे मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी सांगितले.**



मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आंदोलनातील प्रमुख मागण्यांमध्ये मृत आंदोलकांच्या वारसदारांना नोकरी देण्याच्या मागणीचाही समावेश होता. या मागणीसंदर्भात आज, मंगळवारी सामान्य प्रशासन विभागाने तातडीने शासन आदेश जारी करून मराठा आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या वारसदारांची पडताळणी करून त्यांना प्रमाणपत्र देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याचे मंत्री विखे यांनी सांगितले.

काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन केले होते. त्यावेळी उपोषण सोडताना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री विखे यांनी मृत आंदोलकांच्या वारसदारांना एमआयडीसीमध्ये नोकरी देण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. यापूर्वी मृत आंदोलकांच्या वारसदारांना परिवहन महामंडळात समाविष्ट करून घेण्याचे ठरले होते.

### महायुती सरकार संवेदशनशील

अंतरवाली सराटी येथील आंदोलनादरम्यान मनोज जरांगे पाटील यांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकार करत आहे. मराठा समाजाच्या मागण्यांबाबत महायुती सरकार संवेदनशील असून यापूर्वीही सकारात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. भविष्यातही समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे मंत्री तथा अध्यक्ष, मराठा आरक्षण उपसमिती राधाकृष्ण विखे यांनी सांगितले.



# विखे-पाटील लवकरच भिकेला लागणार : राऊत

**महाईन्यूज । अहिल्यानगर**

शिवसेना नेते संजय राऊत यांची तोफ आज अहिल्यानगरात दणाणली. मंत्री विखे-पाटील यांनी काल उबाठा शिल्लक राहणार नाही असे वक्तव्य केले होते.

त्याचा समाचार घेताना राऊत म्हणाले की अहो, राधाकृष्ण विखे पाटील याच उबाठाने तुम्हाला आणि तुमच्या वडिलांना मंत्री केले होते. तुम्ही अनेक घरं बदलून भाजपात आलात.तुम्ही आम्हाला निष्ठा शिकवू नका. काँग्रेसने यांना मोठं केलं, हे ऐहसान फरामोश आहेत. भाजपच्या पालख्या वाहाताय, वाईट काळ सर्वांवर येतो.उद्या तुमचा वाईटकाळ येईल, तेंव्हा काहीजण जेलमध्ये जातील, एकनाथ शिंदे हिमालयात निघून जातील. विखे पाटील तुम्ही तुमचे लाचारीचे काम चालू ठेवा, पण शिवसेनेच्या नादी लागू नका,अन्यथा मला इथे येऊन बसावे लागेल असा इशाराही राऊत यांनी शिर्डी येथील शिवसेनेच्या मेळाव्यात दिला.

संजय राऊत पुढे म्हणाले की आपल्याला पुढील अडीच तीन वर्षे फक्त पक्ष आणि संघटन बांधायचे आहे. शिवसेनेला पुन्हा गतवैभव मिळवून द्यायचे आहे, ही बाळासाहेबांची शिवसेना, मिंध्येची नाही. आपली शिवसेना हीच खरी बाळासाहेबांची शिवसेना आहे. दुसरी अमित शहाची सेना, उठ म्हटले की उठतात.. बस म्हटले की बसतात अशीही टीका यावेळी राऊत यांनी केली. हे सरकार एक परीक्षा नीट घेऊ शकत नाही, राज्य काय चालवणार? असे संजय राऊत यांनी यावेळी म्हटले.

# राज्यातील ५५.७२ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटींची कर्जमाफी!

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यातील अपुरा पाऊस आणि संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने आज मोठा निर्णय घेतला. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील सुमारे ५५ लाख ७० हजार शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी देण्याची निर्णय मंत्रिमंडळ घेण्यात आला.**



> "दोन लाखापर्यंतचे थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज सरकार भरणार आहे. तर दोन लाखापेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांने दोन लाखाच्या वरचे कर्ज भरल्यानंतरच त्याचे दोन लाखांचे कर्ज सरकार भरेल. तर नियमित कर्ज भरणाऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान आहे."
>
> **- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

त्यानुसार २० जून पूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीचे पैसे जमा करावेत आणि त्यांची खाती कर्ज खाती खुली करावीत असे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी या बैठकीत सहकार विभागाला दिले.

राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांच्या मर्यादित कर्जमाफीचा लाभ देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेवर आज मंगळवारी राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब होण्याची शक्यता वर्तविली आहे. कर्जमाफीबाबतच्या सहकार विभागाच्या प्रस्तावावर मंत्रिमंडळ कोणता निर्णय घेते याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

सन २०२४च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान शेतकऱ्यांना खूष करण्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणा केली होती. या योजनेच्या माध्यमातून ज्या शेतकऱ्यांचे ३० सप्टेंबर २५ पर्यंत पीक कर्ज थकीत आहे, त्यांना दोन लाखाच्या मर्यादित कर्जमाफी देण्याची तसेच नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन निधी देण्याची घोषणा केली होती.

# 9 ट्रिलियन येन खर्च; क्षेपणास्त्र खरेदी!

## शांततावादी जपानने अचानकच युद्धाची तयारी का सुरू केली?

**महाईन्यूज । वॉशिंग्टन**

**दुसऱ्या महायुद्धानंतर जाणीवपूर्वक शांततावादी राष्ट्र म्हणून स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या जपानने आता आपल्या संरक्षण धोरणात ऐतिहासिक बदल केले आहेत. चीनचा वाढता लष्करी खर्च, पूर्व चीन समुद्रातील 'सेन्काकू बेटांवरून' सुरू असलेला चीन जपान वाद (China Japan Dispute) आणि तैवानवरील संभाव्य संकट यामुळे जपानला आपले लष्करी सामर्थ्य वाढवणे भाग पडले आहे.**



### लष्करीकरणाच्या दिशेने

मात्र वास्तव वेगळे आहे. संरक्षण खर्चात अभूतपूर्व वाढ, लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांची खरेदी, शस्त्रास्त्र निर्यातीवरील निर्बंध शिथिल करणे, सायबर युद्धक्षमता वाढविणे आणि इंडो- पॅसिफिकमधील संरक्षण भागीदारी मजबूत करणे या माध्यमातून जपानने त्यांच्या संरक्षणविषय धोरणांमध्ये मोठे बदल केले आहेत. त्यामुळेच चीनच्या वाढत्या लष्करी सामर्थ्यामुळे जपानने आता शांततेचा मार्ग सोडून पुन्हा एकदा लष्करीकरणाच्या दिशेने प्रवास सुरू केल्याची चर्चा जगभरात सुरू झाली आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर जपानने स्वतःची ओळख जाणीवपूर्वक शांततावादी राष्ट्र म्हणूनच घडवली. हिरोशिमा आणि नागासाकीवरील अणुबॉम्ब हल्ले, युद्धातील पराभव आणि साम्राज्यवादी भूतकाळ यामुळे जपानी समाजाने युद्धापासून जाणीवपूर्वक दूर राहण्याचा मार्ग स्वीकारला. जपानने त्यांच्या सैन्याचे नाव बदलून 'सेल्फ डिफेन्स फोर्सेस' (SDF) म्हणजे स्वसंरक्षणार्थ असलेले दल असे नाव स्वीकारले. अनेक दशकांपर्यंत हीच जपानची राष्ट्रीय ओळख राहिली.

सिंगापूर येथे ३१ मे रोजी झालेल्या शांग्री-ला परिषदेत चीनने लष्करीकरणाचा आरोप जपानवर केला. त्याला जपानचे संरक्षणमंत्री शिंजिरो कोइझुमी यांनी सडेतोड उत्तर देत सांगितले की, जपानचा निर्णय या स्वसंरक्षणाचा मुद्दा समोर ठेऊन घेण्याचा आला आहे, चीनच्या आरोपांमध्ये तथ्य नसल्याचेही त्यांनी सांगितले. शिवाय हेही सांगण्यास ते विसरले नाहीत की, चीनचा सातत्याने वाढणारा संरक्षण खर्च, सैन्याच्या वाढत्या हालचाली आणि आक्रमक प्रादेशिक धोरण याबाबी संपूर्ण आंतरराष्ट्रीय समुदायासाठी चिंतेच्या ठरल्या आहेत. संघर्ष झाल्यास स्वतःचे संरक्षण करता यावे, यासाठीच सज्जता आवश्यक आहे, असे मत जपानच्या वतीने व्यक्त करण्यात आले. जपानची सज्जता ही युद्धासाठी नाही, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

गेल्या दोन दशकांत चीनने पीपल्स लिबरेशन आर्मीचे (PLA) आधुनिकीकरण करण्यावर भर दिला आहे. सर्वाधिक संरक्षण खर्च करण्याच्या बाबतीत अमेरिकेनंतर चीन दुसऱ्या क्रमांकावर आहे. सध्या चीनचा संरक्षण खर्च सुमारे २७७ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला आहे. नौदलाचा विस्तार, हायपरसॉनिक क्षेपणास्त्रे, आधुनिक लढाऊ विमाने यावर चीन मोठ्या प्रमाणावर खर्च करतो आहे. जपानसाठी सर्वात मोठी चिंतेची बाब म्हणजे पूर्व चीन समुद्रातील सेन्काकू बेटे. ही बेटे जपानच्या ताब्यात असली तरी चीनचा त्यावर दावा आहे.

# अमेरिकेतील भारतीय अडचणीत!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या स्थलांतरितांवर पुन्हा एकदा तीव्र कारवाई करण्यात आली आहे, ज्यामध्ये भारतीयांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. अमेरिकेच्या सीमा सुरक्षा दलाने स्थलांतर नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीरपणे कमर्शियल ट्रक चालवणाऱ्या 30 भारतीय नागरिकांसह एकूण 52 जणांना अटक केली आहे.**



### काय आहे ऑपरेशन चेकमेट?

अमेरिकी कस्टम अँड बॉर्डर प्रोटेक्शनने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत अहवालानुसार, हा विशेष तपास अभियान 11 मे ते 15 मे या कालावधीत ॲरिझोनाच्या युमा सेक्टरमध्ये राबवण्यात आला होता. या पाच दिवसांच्या कारवाईत एकूण 52 जणांना ताब्यात घेण्यात आले असून; सुरक्षा यंत्रणांच्या तपासात, यातील 36 जण अमेरिकेत कोणत्याही वैध इमिग्रेशन दस्तऐवजांशिवाय राहत होते आणि व्यावसायिक सेमी-ट्रक चालवत होते. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या 36 बेकायदेशीर ट्रक चालकांपैकी 30 जण भारतीय नागरिक आहेत. तर उर्वरित 6 जण मेक्सिको, अल साल्वाडोर आणि रशियाचे रहिवासी आहेत.

तपास यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या काही ड्रायव्हर्सकडे कॅलिफोर्निया, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन आणि व्हर्जिनिया या राज्यांतून जारी करण्यात आलेले व्यावसायिक ड्रायव्हिंग लायसन्स आढळून आले आहेत. मात्र, काही जणांकडे कोणतेही वैध लायसन्स नव्हते. ताब्यात घेण्यात आलेल्या अनेक व्यक्तींकडे पूर्वीच्या प्रशासनाच्या काळात मिळालेले रोजगार अधिकार दस्तऐवज होते, परंतू सध्याच्या घडीला त्या पुराव्यांची कायदेशीर वैधता संपली असल्याचे तपासात उघड झाले आहे.

दरम्यान, युमा सेक्टरचे मुख्य गशती एजंट डस्टीन कॉडल यांनी सांगितले की, 'सार्वजनिक सुरक्षेला असणारा धोका कमी करणे आणि रस्ते अपघात रोखणे हा या कारवाईचा मुख्य उद्देश आहे.' ही कारवाई सध्याच्या प्रशासनाच्या बेकायदेशीर स्थलांतर विरोधी मोहिमेचा एक भाग आहे.

नुकतेच अमेरिकेच्या परिवहन विभागाने एक नवीन परिपत्रक जारी केले आहे, ज्याचा मुख्य हेतू अयोग्य परदेशी नागरिकांना व्यावासायिक ट्रक आणि बस चालवण्याचे लायसन्स मिळवण्यापासून पोखणे हा आहे. सध्या ताब्यात घेण्यात आलेल्या सर्व 52 नागरिकांवर अमेरिकी फेडरल कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून, पुढील कायदेशीर प्रक्रियेनंतर त्यांना मायदेशी पाठवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेमुळे अटक करण्यात आलेल्या सर्व संशयितांवर आता अमेरिकेतून हद्दपारीची कायदेशीर कारवाईची शक्यता निर्माण झाली आहे.



# ...तर नुकसान अटळ! बड्या गुंतवणूकदाराचा सूर बदलला!

**महाईन्यूज । मुंबई**

प्रसिद्ध पुस्तक 'रिच डॅड पुअर डॅड'चे लेखक रॉबर्ट कियोसाकी सोशल मीडियावर अतिशय सक्रिय असतात. ते जवळपास दररोज गुंतवणुकीवर सल्ले देत असतात. आता सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर त्यांची नवी पोस्ट व्हायरल झाली आहे. त्यात त्यांनी आर्थिक नियोजन करणाऱ्यांना सावध राहण्याचा सल्ला दिला आबे. सोनं , चांदी आणि बिटकॉईनमध्ये पैसे गुंतवणाऱ्याचा सल्ला देणाऱ्या कियोसाकी यांचे सूर आता बदललेले दिसत आहेत.

रॉबर्ट कियोसाकी यांनी एक्सवर एक पोस्ट लिहिली आहे. 'जर आर्थिक नियोजनकार तुम्हाला सांगत असेल की अमेरिकन बॉण्ड सुरक्षित आहेत आणि त्यात गुंतवणूक करा. तर त्याच्यावर डोळे झाकून विश्वास ठेवू नका. कारण इथे काहीही सुरक्षित नाही. डोळे झाकून विश्वास ठेवल्यास तुमचं मोठं नुकसान होऊ शकतं,' असा धोक्याचा इशारा कियोसाकी यांनी दिला.

रिड डॅड पुअर डॅडचे लेखक असलेल्या कियोसाकी यांनी त्यांच्या पोस्टमध्ये पुढे सोनं-चांदी आणि क्रिप्टोकरन्सी बिटकॉईन संदर्भात महत्त्वाचा सल्ला दिला आहे. 'केवळ अफवा आणि प्रचाराच्या आधारावर सोनं, चांदी किंवा बिटकॉईन खरेदी केल्यास इथे तुमचा पैसा बुडण्याची जोखमी असते,' असा धोक्याचा इशारा कियोसाकी यांनी दिला.

कियोसाकी यांच्यानुसार, गुंतवणूक आणि आर्थिक नियोजन करताना पैशांच्या प्रवाहाकडे लक्ष ठेवा. आजकाल अमेरिकेचे बॉण्ड ठेवणाऱ्या अनेक देशांनी आपली रणनीती बदलली आहे. जपान आणि चीन आता अमेरिकन बॉण्ड विकून सोनं आणि चांदी खरेदी करत आहेत.



# 'पेड्डी' प्रमोशनमध्ये गोंधळ! जान्हवी कपूर घाबरली!

अभिनेता राम चरण आणि अभिनेत्री जान्हवी कपूर यांच्या आगामी 'पेड्डी' चित्रपटाच्या प्रमोशनात व्यस्त आहेत. मागील काही दिवसांपासून 'पेड्डी' चित्रपटाचे जोरदार प्रमोशन सुरु आहे, आता विजयवाडा येथे प्रमोशनाच्या दरम्यान एक धक्कादायक घटना घडली. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. मंचावर चित्रपटाचे प्रमोशन करत असताना, राम चरणसारखा दिसणारा एक चाहता अचानक त्यांच्या दिशेने धावत आला. यावेळी अभिनेत्री समोर बसलेली होती आणि जेव्हा तो चाहता राम चरणच्या दिशेने आला तेव्हा जान्हवी कपूरच्या तोंडावर भिती पाहायला मिळाली. राम चरण आणि जान्हवी कपूर हे दोघे शेजारी बसलेले होते, यावेळी प्रमोशन सुरु होते. जेव्हा तो चाहता राम चरण याच्याकडे धावला तेव्हा राम चरणचा वैयक्तिक बॉडीगार्ड आणि एमएमए फायटर केविन कुंटाने यावेळी लगेचच धाव घेतली आणि त्या चाहत्याला थांबवले आणि आणि स्टेजवरून खाली नेले. हा व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. राम चरण याला भेटायला आलेला राम चरणचा चाहता हा अभिनेत्यासारखाच दिसत आहे. व्हिडिओमध्ये असलेला राम चरणचा बॉडीगार्ड हा मागील काही दिवसांमध्ये फारच व्हायरल झाला आहे.

# तिशीच्या आत लग्न व्हावं!

तेजश्री प्रधान ही मराठी कलाविश्वातील सुप्रसिद्ध अभिनेत्री असून तिनं अनेक गाजलेल्या मालिकांमध्ये काम केलंय. अभिनेत्रीचा मोठा चाहतावर्गही आहे. त्यामुळे तेजश्री लग्न कधी करणार याकडे चाहत्यांचं लक्ष वेधलं आहे. एका मुलाखतीमध्ये तेजश्री प्रधाननं लग्नाबद्दल आणि घटस्फोटाबद्दल भाष्य केलेलं.

**लग्नाबद्दल काय म्हणालेली तेजश्री प्रधान?**

तेजश्री प्रधान तिच्या कामासोबतच स्पष्टवक्तेपणासाठीही ओळखली जाते. एका मुलाखतीदरम्यान तेजश्री प्रधानला लग्नाच्या वयाबद्दल विचारण्यात आलं. त्यावर अभिनेत्री म्हणालेली, 'आजच्या काळात करिअरला प्राधान्य असल्यामुळे अनेकजण उशिरा लग्नाचा विचार करतात. पण मला वैयक्तिकरीत्या असं वाटतं की, लग्न तिशीच्या आतच व्हायला हवं. म्हणून मी तेव्हा लग्न केलं होतं. ते जास्त काळ टिकू शकलं नाही, ही नंतरची गोष्ट आहे. त्याचं कारण म्हणजे, तिशीच्या आधी आपण स्वतःमध्ये बदल करू शकतो, नवीन गोष्टी स्वीकारणं सोपं असतं. एकदा वय वाढलं की स्वतःला बदलणं कठीण होतं.'

**कुटुंबाची साथ महत्वाची**

तेजश्री पुढे म्हणाली की, 'आताच्या काळात हे स्वीकारणं सोपं झालंय. मी ज्या काळात त्यातून गेले, तेव्हा थोडं कठीण असेल, पण उलट आजच्या काळात मला बरं वाटतंय की, आई-वडील त्यांच्या मुलींच्या, मुलांच्या बाजूने उभे राहतात. तुमचं कुटुंब तुमच्या बाजूने उभे असते, ही छान गोष्ट आहे. जग पुरोगामी होतंय, प्रगती होत आहे ही चांगली गोष्ट आहे. माझ्या आयुष्यात जे चढ-उतार आले, त्या काळात माझं कुटुंब माझ्याबरोबर होतं, हे मी अभिमानानं सांगू शकते. तुमचं कुटुंब तुमच्याबरोबर असेल, तर तुम्ही जगाशी लढू शकता. बाकी कोणाची गरज पडत नाही.' असं तेजश्री प्रधाननं दिलेल्या मुलाखतीमध्ये सांगितलेलं.



# रेखाबरोबर रिलेशनशिप : अमिताभ बच्चन स्पष्टच म्हणालेले!

अमिताभ बच्चन यांनी १९६९ ला प्रदर्शित झालेल्या सात हिंदूस्तानी या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. १९७३ ला प्रदर्शित झालेल्या जंजीर चित्रपटातून त्यांना मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. अमिताभ बच्चन आजही विविध भूमिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येतात. ते सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात सक्रिय असतात. बिग बी त्यांच्या ब्लॉगमध्ये त्यांचे अनुभव सांगतात. विविध चित्रपटांच्या सेटवरील ते किस्से सांगतात. अनेकदा त्यांची जुनी वक्तव्येदेखील चर्चेत असतात.



अमिताभ बच्चन व रेखा हे रिलेशनशिपमध्ये होते, अशा चर्चा आजही होताना दिसतात. त्यांनी अनेक सिनेमांत एकत्र काम केले आहे. सिनेमांतील त्यांची केमिस्ट्री प्रेक्षकांना चांगलीच आवडली होती. त्यानंतर ते रिलेशनमध्ये असल्याचे म्हटले जात होते. यावर एकदा अमिताभ बच्चन यांनी वक्तव्य केले होते. अमिताभ बच्चन यांनी सिमी गरेवालला दिलेल्या एका मुलाखतीत रेखा यांच्याबरोबर कसे नाते आहे, यावर वक्तव्य केले होते. ते म्हणालेले, “ती माझी सह कलाकार होती आणि माझी सहकारी होती. सहाजिकच जेव्हा आम्ही एकत्र काम करत होतो, तेव्हा आम्हाला एकमेकांना भेटावे लागे, आमची भेट होत असे. इतर पुरस्कार सोहळे आणि कार्यक्रमादरम्यानही आमची भेट होत असे, पण ते तेवढ्यापुरतेच मर्यादित होते”, असे म्हणत अमिताभ बच्चन यांनी रेखा यांच्याबरोबर ते रिलेशनशिपमध्ये नव्हते, ते त्यांच्या प्रेमात नव्हते, असे स्पष्ट केले होते. मिताभ बच्चन यांनी वारंवार रेखा यांच्याबरोबरच्या रिलेशनशिपच्या अफवा फेटाळून लावल्या असल्या तरी आजही त्यांच्या नात्याबद्दल वेळोवेळी चर्चा होताना दिसते. असेही म्हटले जाते की, सिलसिला या सिनेमात रेखा, अमिताभ बच्चन व जया बच्चन यांच्या खऱ्या आयुष्याचे पडसाद पाहायला मिळतात. या सिनेमात हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत होते. या तीन लोकप्रिय कलाकारांनी एकत्र काम केलेला हा तिसरा सिनेमा होता. १९८१ ला सिलसिला हा सिनेमा प्रदर्शित झाला होता.

जया व अमिताभ बच्चन यांनी ३ जून १९७३ ला लग्नगाठ बांधली. त्यांना श्वेता व अभिषेक ही दोन मुले आहेत. अभिषेक हा आई-वडिलांप्रमाणे अभिनय क्षेत्रात काम करत आहे. अलीकडे अभिषेकच्या अनेक सिनेमांचे, त्यांच्या भूमिकांचे कौतुक झाले आहे. नुकताच तो राजा शिवाजी सिनेमात महत्त्वाची भूमिका साकारताना दिसला. ही भूमिका पाहिल्यानंतर अनेकांनी त्याचे कौतुक केले होते. आता तो लवकरच शाहरुख खानबरोबर किंग सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वी या सिनेमातील त्याचा लूक व्हायरल झाला होता.

दरम्यान, अमिताभ बच्चन यांच्या कामाबद्दल बोलायचे तर ते लवकरच कल्की २ या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत.

# टीम इंडियाचं आयपीएलनंतर व्यस्त वेळापत्रक!

## अफगाणिस्तानपासून इंग्लंड, न्यूझीलंडपर्यंत; पाहा संपूर्ण सामन्यांची यादी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दोन महिन्यांच्या थरारक आणि रंगतदार लढतीनंतर आयपीएल २०२६ हंगामाचा शेवट झाला. अहमदाबादमध्ये झालेल्या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने गुजरात टायटन्सवर ५ विकेट्सने विजय मिळवत इतिहासातील दुसरं आयपीएल विजेतेपद पटकावलं. आयपीएलनंतर आता अवघ्या काही दिवसांतच टीम इंडिया भारताच्या जर्सीमध्ये दिसणार आहे. भारतीय संघाचं पुढील वेळापत्रक कसं असणार आहे, जाणून घेऊया.**

आयपीएल संपून अवघ्या एका आठवड्यात भारतीय क्रिकेट पुन्हा आंतरराष्ट्रीय रंगमंचावर परतणार आहे. ६ जूनपासून न्यू चंदीगडमध्ये भारताच्या आंतरराष्ट्रीय मालिकांना सुरुवात होणार आहे. भारतीय क्रिकेट संघ ६ ते २० जूनदरम्यान अफगाणिस्तानविरुद्ध एक कसोटी आणि तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळणार आहे. मुल्लानपूर येथे होणारी कसोटी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (WTC) चक्राचा भाग नसणार आहे.

यानंतर भारतीय संघ आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यादरम्यान एकूण सात टी-२० आणि तीन एकदिवसीय सामने खेळले जाणार आहेत. ऑगस्ट महिन्यात श्रीलंकाविरुद्ध जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेअंतर्गत दोन कसोटी सामने नियोजित आहेत. मात्र, या मालिकेचे अधिकृत वेळापत्रक अद्याप जाहीर करण्यात आलेलं नाही. यानंतर सप्टेंबरच्या अखेरीस भारताच्या २०२६-२७ हंगामातील घरच्या मैदानावरील आंतरराष्ट्रीय मालिकांना सुरुवात होणार आहे.

या कालावधीत भारतीय संघाला कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० अशा तिन्ही प्रकारच्या फॉरमॅटमधील सामने खेळायचे असून संघाचं व्यस्त वेळापत्रक असणार आहे. विशेष म्हणजे, २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीने एकदिवसीय मालिकांना मोठं महत्त्व असणार आहे.



### भारताचा एकदिवसीय संघ:

शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर (उपकर्णधार), केएल राहुल (यष्टीरक्षक), ईशान किशन (यष्टीरक्षक), हार्दिक पंड्या, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग, प्रसिध कृष्णा, प्रिन्स यादव, गुरनूर ब्रार, हर्ष दुबे.

### भारताचे आगामी क्रिकेट वेळापत्रक

- ६ ते २० जून : अफगाणिस्तानचा भारत दौरा — १ कसोटी, ३ एकदिवसीय
- २६ ते २८ जून : भारताचा आयर्लंड दौरा — २ टी-२० आंतरराष्ट्रीय
- १ ते १९ जुलै : भारताचा इंग्लंड दौरा — ५ टी-२० आंतरराष्ट्रीय, ३ एकदिवसीय
- २३ ते २६ जुलै : भारताचा झिम्बाब्वे दौरा — ३ टी-२० आंतरराष्ट्रीय
- वेळापत्रक जाहीर व्हायचे आहे : भारताचा श्रीलंका दौरा — २ कसोटी
- २७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर : वेस्ट इंडिजचा भारत दौरा — ३ एकदिवसीय, ५ टी-२० आंतरराष्ट्रीय
- वेळापत्रक जाहीर व्हायचे आहे : भारताचा न्यूझीलंड दौरा — २ कसोटी, ३ एकदिवसीय, ५ टी-२० आंतरराष्ट्रीय
- १३ ते २७ डिसेंबर : श्रीलंकेचा भारत दौरा — ३ एकदिवसीय, ३ टी-२० आंतरराष्ट्रीय

### भारत वि. अफगाणिस्तान मालिका २०२६

एकमेव कसोटी: ६ ते १० जून – न्यू चंदीगड
पहिला एकदिवसीय: १३ जून – धर्मशाला
दुसरा एकदिवसीय: १७ जून – लखनौ
तिसरा एकदिवसीय: २० जून – चेन्नई

# कालिनस्कायाची आगेकूच; पुरुषांत झ्वेरेवचा विजय, कॅस्पर रुड पराभूत

**महाईन्यूज । पॅरिस**

**ॲना कालिनस्कायाने सोमवारी ऑिट्रयाच्या अनास्तासिया पोटापोव्हाची स्वप्नवत घोडदौड रोखून फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. कालिनस्कायाने ६-४, २-६, ७-६ (१०-७) अशी बाजी मारली. पुरुष एकेरीत कॅस्पर रुडचे आव्हान संपुष्टात आले, तर जेतेपदासाठी प्रमुख दावेदार असलेल्या ॲलेक्झांडर झ्वेरेवने आगेकूच केली.**

कालिनस्काया आणि पोटापोव्हा यांच्यातील चुरशीने खेळला गेलेला सामना जवळपास तीन तास चालला. तिसऱ्या फेरीत चार वेळच्या विजेत्या इगा श्वीऑटेकचे आव्हान संपुष्टात आणणाऱ्या पोटापोव्हाला निर्णायक सेटमध्ये दोनदा सामना जिंकवून देणारी स्व्हिहस राखण्यात अपयश आले.

त्यानंतर झालेल्या 'सुपर टायब्रेक'मध्ये कालिनस्कायाने १-४ अशा पिछाडीवरून जोरदार पुनरागमन करत विजय मिळवला. जागतिक क्रमवारीत २२व्या स्थानावर असलेल्या कालिनस्कायाची ग्रँडस्लॅम स्पर्धेतील उपांत्यपूर्व फेरी गाठण्याची ही दुसरी वेळ ठरली. यापूर्वी तिने २०२४च्या ऑस्ट्रेलियन स्पर्धेत अशी कामगिरी केली होती.

नोव्हाक जोकोविचला पराभूत करणाऱ्या ब्राझीलच्या १९ वर्षीय जोओ फॉन्सेकाने देखील कारकीर्दीत प्रथमच एखाद्या ग्रँडस्लॅम स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठताना फ्रेंच स्पर्धेत दोन वेळा उपविजेत्या राहिलेल्या कॅस्पर रुडचा ७-५, ७-६ (१०-८), ५-७, ६-२ असा पराभव केला.

झ्वेरेवने फ्रान्सच्या जेस्पर डी यॉन्गचे आव्हान ७-६ (७-३), ६-४, ६-१ असे संपुष्टात आणले. स्पेनच्या राफेल जोदारने आपल्याच देशाच्या पाब्लो कॅरोनो बुस्टाचा ४-६, ४-६, ६-१, ६-२, ६-२ असा पराभव करून प्रथमच ग्रँडस्लॅम स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठली.



स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
epaper.mahaenews.com
ePaper
। बुधवार ।
दि. 03 जून 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# प्रा. सोनाली गव्हाणे यांच्या तत्परतेने मोठी दुर्घटना टळली

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

आदिनाथ नगर येथील सुखवानी रेसिडेन्सी सोसायटी परिसरात MSEDCL च्या ट्रान्सफॉर्मरला अचानक आग लागल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, वेळेवर मिळालेल्या माहितीमुळे आणि प्रशासनाच्या तत्काळ प्रतिसादामुळे मोठा अनर्थ टळला.

या घटनेची माहिती मिळताच नगरसेविका प्रा. सोनाली गव्हाणे यांनी तातडीने संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधत परिस्थितीची गंभीर दखल घेतली. त्यांनी अग्निशमन दल व वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधून तातडीने उपाययोजना राबविण्यासाठी पाठपुरावा केला. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी तात्काळ दाखल होत आग विझविण्याचे काम सुरू केले आणि अल्पावधीतच आगीवर नियंत्रण मिळवले. या वेळी परिसरातील नागरिकांची सुरक्षितता हीच प्राथमिकता ठेवण्यात आली.

नगरसेविका सोनाली गव्हाणे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे तसेच प्रशासनाच्या जलद कार्यवाहीमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळल्याचे स्थानिक नागरिकांनीही नमूद केले.

> “आदिनाथ नगर सुखवानी रेसिडेन्सी परिसरातील ट्रान्सफॉर्मरला लागलेल्या आगीची माहिती मिळताच मी तातडीने संबंधित MSEDCL व अग्निशमन विभागाशी संपर्क साधला. नागरिकांची सुरक्षितता ही आमची सर्वोच्च प्राथमिकता असल्याने सर्व यंत्रणांनी समन्वयाने त्वरित कार्यवाही केली आणि काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही ही दिलासादायक बाब आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी वीज यंत्रणेची सखोल तपासणी व आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करणार आहोत.”
>
> - प्रा. सोनाली गव्हाणे, नगरसेविका.

नागरिकांनी प्रशासनाच्या तत्पर प्रतिसादाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले. या घटनेनंतर परिसरातील वीज यंत्रणेची तपासणी करून आवश्यक दुरुस्ती व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणीही नागरिकांकडून करण्यात येत आहे.







# कशिश प्राईड-अमृतवेल सोसायटी परिसरातील नागरिकांना दिलासा!

## ड्रेनेज ओव्हरफ्लो समस्या अखेर मार्गी, महापालिकेची कार्यवाही; डॉ. सुहास कांबळे यांचा पुढाकार

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**इंद्रायणीनगर प्रभाग क्र. ८: कशिश प्राईड आणि अमृतवेल सोसायटी परिसरातील दीर्घकाळ प्रलंबित असलेली ड्रेनेज ओव्हरफ्लोची समस्या अखेर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या (मनपा) तातडीच्या कारवाईनंतर सोडवण्यात आली आहे.**




> “कशिश प्राईड-अमृतवेल सोसायटी परिसरातील ड्रेनेज समस्येबाबत नागरिकांनी तत्काळ आमच्याशी संपर्क साधल्यानंतर आम्ही तातडीने मनपा प्रशासनाशी समन्वय साधला. नागरिकांचे आरोग्य आणि परिसराची स्वच्छता ही आमची सर्वोच्च जबाबदारी असून, अशा समस्या भविष्यात पुन्हा निर्माण होऊ नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यावर आमचा भर आहे.”
> – **डॉ. सुहास कांबळे,** नगरसेवक तथा सदस्य, शहर सुधारणा समिती.

सेक्टर क्रमांक ४ मधील कशिश प्राईड-अमृतवेल सोसायटीलगत असलेल्या मोकळ्या प्लॉटमध्ये मुख्य ड्रेनेज चेंबरमधून सातत्याने सांडपाणी बाहेर पडत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली होती. साचलेल्या पाण्यामुळे डासांची पैदास वाढून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाल्याची तक्रार स्थानिक रहिवाशांनी केली होती.

ही बाब स्थानिक रहिवाशांनी शहर सुधारणा समितीचे सदस्य तथा नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने मनपा प्रशासनाशी संपर्क साधत उपाययोजना करण्याची मागणी केली. त्यानंतर मनपाच्या जलनि:सारण आणि आरोग्य विभागाने घटनास्थळी जेटींग कम सक्शन मशीन पाठवून तातडीने काम सुरू केले.

या कारवाईदरम्यान ड्रेनेज लाईनमधील गाळ व कचरा काढून साफसफाई करण्यात आली, ओव्हरफ्लो होत असलेल्या चेंबरची दुरुस्ती करण्यात आली तसेच परिसरात निर्जंतुकीकरणाची प्रक्रिया राबवण्यात आली.

कारवाईनंतर परिसरातील सांडपाण्याचा निचरा सुरळीत झाला असून दुर्गंधी आणि आरोग्यधोका कमी झाल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. दरम्यान, भविष्यात अशी समस्या उद्भवू नये यासाठी नियमित देखभाल करण्याची मागणी रहिवाशांकडून करण्यात येत आहे.

# “भ्रष्टाचारी प्रवृत्तींचा कर्दनकाळ” म्हणजे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे!

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील सुमारे ६० कोटी रुपयांच्या बोगस उपसूचना घोटाळा प्रकरणात अखेर मोठी प्रशासकीय कारवाई झाली आहे. या प्रकरणात मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांची राज्य सरकारने बदली केली असून, त्यांच्याजागी नवी मुंबई महापालिकेचे मुख्य लेखा अधिकारी सत्यवान उबाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निर्णयामुळे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आल्याचे मानले जात आहे.**



बोगस उपसूचना घोटाळा प्रकरण उघडकीस आल्यानंतर सभापती अभिषेक बारणे यांनी प्रशासनावर गंभीर आरोप करत, नियमबाह्य पद्धतीने सुमारे ६० कोटी रुपयांच्या फाइल्स मंजूर करून विशिष्ट कंत्राटदारांना आर्थिक फायदा पोहोचवण्यात आल्याचा ठपका ठेवला होता. त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी सातत्याने लावून धरली होती.

या प्रकरणाची प्राथमिक चौकशी मंत्रालय आणि महापालिका स्तरावर करण्यात आली. त्यानंतर सादर झालेल्या अहवालानंतर आणि वाढत्या राजकीय-प्रशासकीय दबावाच्या पार्श्वभूमीवर प्रवीण जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले होते. अखेर राज्य शासनाच्या वित्त विभागाने २९ मे रोजी आदेश जारी करत त्यांची बदली केली.

दरम्यान, या प्रकरणावर फक्त बदली पुरेशी आहे का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. सुमारे ६० कोटी रुपयांच्या कथित गैरव्यवहाराची रक्कम, जबाबदार लोकप्रतिनिधींची भूमिका आणि आर्थिक वसुली याबाबत अद्याप स्पष्टता नाही. त्यामुळे पुढील टप्प्यात या प्रकरणात आणखी कोणावर कारवाई होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या घडामोडीमुळे महापालिकेतील प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, बारणे यांच्या भूमिकेचे समर्थन करणाऱ्यांकडून हा निर्णय “लढ्याचे यश” म्हणून पाहिला जात आहे. विशेष म्हणजे, या कारवाईनंतर बारणेंप्रति प्रशासकीय यंत्रणांमध्ये प्रचंड ‘स्ट्राँग मॅसेज’ गेला आहे. भाजपाचे स्थानिक नेते, आमदार किंवा पदाधिकारी यांनी फारसा हस्तक्षेप न करताही हा विषय महापालिका आणि प्रशासकीय पातळीवर सक्षमपणे हाताळण्यात बारणेंना यश मिळाले आहे. सोबतच पक्षाची प्रतिमा न डागाळता चुकीचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना धडा शिकवल्यामुळे “भ्रष्टाचाराची प्रवृत्तींचा कर्दनकाळ” म्हणून बारणे यांनी स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.

### प्रशासकीय मुत्सद्देगिरीची चुणूक...

वास्तविक, बोगस उपसूचना प्रकरणाला वाचा फोडण्याची भूमिका स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी घेतली. मात्र, विरोधी पक्षातील राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या नगरसेवकांनी हा विषय सत्ताधारी भाजपावर शेकवण्याचा प्रयत्न केला. चौफेर टीका करुन आता प्रकरण भाजपाच्याच अंगलट येणार, असे चित्र निर्माण झाले होते. राज्यातील पक्षश्रेष्ठींकडून माहिती मागवली होती. स्थानिक पातळीवरील हा मुद्दा राज्यातील प्रमुख नेत्यांच्या चर्चेत आला होता. त्यामुळे भाजपाला ‘डॅमेज’ करण्याची संधी विरोधी बाकावरील नेत्यांनी शोधली होती. मात्र, सभागृहात अवघ्या एका टर्मचा अनुभव असलेले अभिषेक बारणे यांनी स्थायी समिती सभापती म्हणून पक्षाची प्रतिमा आणि प्रशासकीय अनागोंदी दोन्हींवर संयमाने प्रहार कायम ठेवला. त्यामुळे चौकशी समिती बसवण्यात आली आणि वादग्रस्त अधिकाऱ्यावर उचलबांगडीची कारवाईसुद्धा करण्यात आली. त्यामुळे स्थायी समिती सभापती म्हणून अभिषेक बारणे यांनी प्रशासकीय मुत्सद्देगिरीची चुणूक दाखवली आहे.

# सोसायटींमधील ओला कचरा संकलनाचा मुद्दा पेटणार!

## पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या नव्या निममावलीला फेडरेशनचा तीव्र विरोध

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने घेतलेल्या नव्या निर्णयानुसार १ जुलै २०२६ पासून दररोज १०० किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण करणाऱ्या सोसायट्या, मंगल कार्यालये, वसतिगृहे, कंपन्या, कँटीन व इतर आस्थापनांचा ओला कचरा महापालिका गोळा करणार नाही. संबंधित आस्थापनांनी आपल्या आवारातच कंपोस्टिंग किंवा बायोमिथनायझेशन प्रकल्प उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे.**




केंद्र शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन नियमांनुसार ही अंमलबजावणी केली जात असल्याचे महापालिकेच्या आरोग्य विभागाने स्पष्ट केले असून, ३० जूनपर्यंत सोसायट्यांना स्वतःच्या स्तरावर कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची मुदत देण्यात आली आहे. नियमांचे पालन न करणाऱ्यांवर दंडात्मक तसेच फौजदारी कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

पहिल्या टप्प्यात ५ हजार आणि दुसऱ्या टप्प्यात १५ हजार रुपये दंड, तसेच सातत्याने नियमभंग झाल्यास पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार जबाबदार व्यक्तींवर खटला दाखल केला जाऊ शकतो, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी फेडरेशनने या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. फेडरेशनचे अध्यक्ष सचिन लोंढे यांनी म्हटले आहे की, गेल्या १० वर्षांपासून सोसायट्यांकडून या विषयावर वारंवार विरोध आणि चर्चा करण्यात आली आहे, तरीही धोरणात्मक निर्णयांमध्ये सोसायट्यांना योग्य सहभाग मिळत नाही. "सोसायट्यांना केवळ उत्पन्न स्रोत म्हणून पाहिले जात आहे, अशी भावना निर्माण झाली आहे. हा दृष्टिकोन आम्ही यापुढे सहन करणार नाही," असे फेडरेशनने स्पष्ट केले आहे.

तसेच, सोसायटीधारक पाणी व्यवस्था, कचरा व्यवस्थापन सारखे नियोजन स्वत:च्या पातळीवर करतील. महापालिका प्रशासनाने त्यासाठी टॅक्स कमी करावा आणि सोसायट्यांना पाणी-कचरा या पायाभूत सोयी-सुविधा स्वत: निर्माण करण्याचे अधिकार द्यावेत. कारण, आम्ही पूर्ण टॅक्स भरतो, त्या बदल्यात प्रशासन आम्हाला काय सोयी-सुविधा देतात? असा प्रश्नही सचिन लोंढे यांनी उपस्थित केला आहे.



"पिंपरी-चिंचवड महापालिकेने घेतलेल्या ओल्या कचरा व्यवस्थापनाच्या निर्णयाबाबत सोसायट्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने आपली भूमिका मांडली आहे. तरीही धोरणात्मक निर्णय घेताना सोसायट्यांना प्रत्यक्ष सहभागी करून घेतले जात नाही, ही खंत आहे. सोसायट्यांवर केवळ जबाबदाऱ्या टाकणे योग्य नाही. शहराच्या कचरा व्यवस्थापनात सोसायट्यांना भागीदार म्हणून मान्यता देत, व्यवहार्य आणि समन्वयात्मक उपाययोजना कराव्यात, अशी आमची ठाम मागणी आहे. अन्यथा हा प्रश्न अधिक गंभीर स्वरूप धारण करू शकतो.

**- सचिन लोंढे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी फेडरेशन.**

### सर्वसाधारण सभेतील चर्चेकडे लक्ष...

फेडरेशनने सर्व १२८ नगरसदस्यांना निवेदन देण्यास सुरुवात केली असून, आगामी १५ जूनच्या सर्वसाधारण सभेत हा मुद्दा प्रभावीपणे मांडावा अशी मागणी केली आहे. तसेच, शहरातील कचरा व्यवस्थापन धोरण ठरवताना सोसायट्यांवर येणारा वाढता प्रशासकीय भार विचारात घ्यावा, अशीही विनंती करण्यात आली आहे. कचरा व्यवस्थापनाच्या नव्या नियमांमुळे शहरात स्वच्छता आणि विकेंद्रित प्रक्रिया प्रणालीला चालना मिळणार असली तरी, सोसायटी फेडरेशन आणि महापालिका यांच्यात या अंमलबजावणीवरून मतभेद वाढताना दिसत आहेत. आगामी सर्वसाधारण सभेत या मुद्द्यावर चर्चा निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

# खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते संभाजी भेगडे यांचा सत्कार!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शिवसेना उद्योग सहकारी सेनेच्या पिंपरी-चिंचवड शहर प्रमुखपदी संभाजी भेगडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



"शिवसेना उद्योग सहकारी सेनेच्या पिंपरी-चिंचवड शहर प्रमुखपदाची जबाबदारी ही माझ्यासाठी सन्मानासोबतच मोठी जबाबदारी आहे. खासदार श्रीरंग बारणे यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. पिंपरी-चिंचवडमधील उद्योजक, व्यावसायिक आणि कार्यकर्त्यांना एकत्रित घेऊन उद्योग क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी तसेच संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी मी कटिबद्धपणे काम करणार आहे.

**– संभाजी भेगडे, शहर प्रमुख, सहकारी सेना, शिवसेना.**

सत्कार सोहळ्यात खासदार बारणे यांनी संभाजी भेगडे यांना पुढील संघटनात्मक वाटचालीसाठी शुभेच्छा देत उद्योग क्षेत्रातील कार्यकर्ते आणि उद्योजकांना एकत्रित करून संघटना अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले.

यावेळी संभाजी भेगडे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "खासदार श्रीरंग बारणे यांचे मार्गदर्शन नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. त्यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास आणि दिलेली जबाबदारी मी प्रामाणिकपणे पार पाडणार असून, पिंपरी-चिंचवडमधील उद्योजक, व्यावसायिक आणि कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटनेच्या बळकटीसाठी काम करणार आहे."

या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते प्रकाश भेगडे, पुणे शहराध्यक्षा सदानंद कडलक, राज्य समन्वयक विपुल चेपट, विष्णू पाटील, शुभम लोखंडे, ॲड. प्रवीण गायकवाड, सुदर्शन देसले, हरिनारायण डोबाळे, उद्योजक हेमंत नागपुरे, सौ. आरती भेगडे, दत्ताभाऊ कुचेकर, आशिष चव्हाण, धर्मेंद्र जयदे, चैतन्य होळकर, राहुल अडगळे, अश्विन खुडे, प्रताप देवडकर, महेश नेरे, तन्मय जाधव, सिद्धांत पाटील, साई पवार, संकेत शिंदे, सुदर्शन चिकणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

संभाजी भेगडे यांच्या नियुक्तीमुळे पिंपरी-चिंचवड औद्योगिक क्षेत्रात शिवसेना उद्योग सहकारी सेनेच्या संघटनात्मक विस्ताराला नवी चालना मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. उद्योग, सहकार आणि सामाजिक क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी भेगडे यांच्या नेतृत्वाखाली संघटना अधिक प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# ... तर कचरा आयुक्तांच्या दालनात टाकू!

## चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनची आक्रमक भूमिका

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून 1 जुलै 2026 पासून मोठ्या गृहसोसायट्यांमधील ओला कचरा उचलणे बंद करण्याचा प्रस्ताव पुढे आल्याने शहरातील गृहसंकुलांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे. हा निर्णय एकतर्फी, अव्यवहार्य आणि सोसायटीधारकांवर अन्याय करणारा असल्याचा आरोप चिखली–मोशी–पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनने केला आहे.**





फेडरेशनने या संदर्भात महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना लेखी निवेदन सादर केले असून, कोणतीही पूर्वचर्चा किंवा समन्वय न करता असा निर्णय घेतल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

फेडरेशनच्या मते, केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 नुसार 100 पेक्षा जास्त सदनिका असलेल्या गृहप्रकल्पांमध्ये ओला कचरा प्रक्रिया करण्यासाठी ओला कचरा प्रक्रिया यंत्रणा (OWC मशीन) बसवणे बंधनकारक आहे. तसेच अशा प्रकल्पांना बांधकाम परवानगी आणि पूर्णत्वाचे दाखले देताना या नियमांचे पालन झाल्याची खात्री करणे अपेक्षित आहे.

मात्र, प्रत्यक्षात पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक मोठ्या गृहप्रकल्पांमध्ये ही व्यवस्था अस्तित्वात नसतानाही त्यांना बांधकाम पूर्णत्वाचे दाखले देण्यात आल्याचा गंभीर आरोप फेडरेशनने केला आहे. मागील अनेक वर्षांपासून हा मुद्दा सातत्याने प्रशासनासमोर मांडूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असा दावा करण्यात आला आहे.

नव्या प्रस्तावित धोरणानुसार महापालिकेकडून मोठ्या सोसायट्यांमधील ओला कचरा उचलणे बंद करण्यात येणार असल्याची चर्चा आहे. यामुळे संपूर्ण जबाबदारी थेट सोसायटी व्यवस्थापनावर येणार असून, प्रत्यक्षात जागेची कमतरता, तांत्रिक अडचणी आणि पूर्वनियोजनाचा अभाव यामुळे हा निर्णय व्यवहार्य नसल्याचे फेडरेशनने स्पष्ट केले आहे. अनेक सोसायट्यांमध्ये ओला कचरा प्रक्रिया यंत्रणा उभारण्यासाठी आवश्यक असलेली मोकळी जागा उपलब्ध नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे हा निर्णय म्हणजे सोसायट्यांवर अन्यायकारक आर्थिक आणि व्यवस्थापकीय भार टाकण्यासारखा असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### पूर्वचर्चा न करता निर्णय नको – फेडरेशनची मागणी

फेडरेशनने स्पष्ट केले आहे की, अशा प्रकारचा कोणताही निर्णय घेण्यापूर्वी शहरातील सर्व सोसायटी फेडरेशन पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करणे आवश्यक आहे. शहरातील लाखो नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या धोरणात पारदर्शकता आणि समन्वय असणे अपेक्षित असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर, महापालिकेने जर कोणतीही चर्चा न करता एकतर्फी निर्णय लागू केला, तर त्याला तीव्र विरोध केला जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. परिस्थिती गंभीर झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल, तसेच निर्माण होणारा ओला कचरा थेट महापालिका आयुक्तांच्या दालनात आणून टाकण्याचा इशाराही फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी दिला आहे.



जर महापालिकेने आमच्याशी कोणतीही पूर्वचर्चा न करता एकतर्फी निर्णय घेतला आणि मोठ्या सोसायट्यांमधील ओला कचरा उचलणे बंद केले, तर हा सर्व कचरा आम्हाला नाइलाजाने महापालिका आयुक्तांच्या दालनात आणून टाकावा लागेल. मागील अनेक वर्षांपासून आम्ही घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 ची अंमलबजावणी आणि बांधकाम व्यावसायिकांची जबाबदारी याबाबत प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत आहोत. मात्र, त्यावर ठोस कारवाई न होता उलट सोसायटीधारकांवरच भार टाकला जात असेल, तर तो आम्हाला मान्य होणार नाही.

**- संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली–मोशी–पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**

# सोशल मीडियावरील जनगणनेच्या अफवांपासून सावध राहा : आयुक्त

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहरात सुरू असलेल्या 'जनगणना २०२७'च्या घरसूचीकरण व घरगणना सर्वेक्षणासंदर्भात सोशल मीडियावर दिशाभूल करणारे संदेश, अफवा आणि अप्रमाणित माहिती प्रसारित होत असल्याने नागरिकांनी अशा अपप्रचारावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने केले आहे. जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया ही अधिकृत, पारदर्शक आणि पूर्णतः डिजिटल पद्धतीने राबविली जात असून, कोणत्याही खोट्या माहितीस बळी पडू नये, असे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले आहे.**



सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अप्रमाणित माहिती, अफवा किंवा दिशाभूल करणाऱ्या संदेशांवर विश्वास न ठेवता नागरिकांनी केवळ अधिकृत जनगणना कर्मचाऱ्यांनाच सहकार्य करावे. संपूर्ण जनगणना प्रक्रिया सुरक्षित, पारदर्शक आणि डिजिटल स्वरूपात 'एचएलओ ॲप 'च्या माध्यमातून राबविली जात असून नागरिकांनी विश्वासाने आणि जबाबदारीने आपला सहभाग नोंदवावा.

**- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त.**

सोशल मीडियावर जनगणना प्रक्रियेबाबत विविध प्रकारची अप्रमाणित माहिती आणि खोटी संकेतस्थळे प्रसारित होत असून, त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असल्याचे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.

महापालिकेने नियुक्त केलेल्या अधिकृत प्रगणक आणि पर्यवेक्षक यांच्या माध्यमातूनच जनगणनेचे काम सुरू आहे. या प्रक्रियेत कोणत्याही कागदी फॉर्मचा वापर न करता मोबाईलवरील अधिकृत 'एचएलओ ॲप 'द्वारे ऑनलाइन स्वरूपात माहिती नोंदविली जात असल्याचे शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.

महापालिकेच्या माहितीनुसार, 'जनगणना २०२७'च्या पहिल्या टप्प्यातील घरसूचीकरण व घरगणनेच्या प्रत्यक्ष कामास १६ मे २०२६ पासून सुरुवात झाली असून, ही प्रक्रिया १४ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. एचएलओ ॲपच्या माध्यमातून घरांचे सर्वेक्षण यशस्वीपणे पूर्ण करण्यात येत असून, ही प्रक्रिया सुरक्षित, अचूक आणि पूर्णतः डिजिटल स्वरूपात राबविली जात असल्याचेही शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी नमूद केले.

प्रशासनाने नागरिकांना खोट्या संकेतस्थळांपासून आणि सोशल मीडियावरील अफवांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. अचूक जनगणना ही शहर विकासाची भक्कम पायाभरणी असून, शाळा, आरोग्य सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते आणि इतर नागरी सेवांचे नियोजन अचूक माहितीच्या आधारेच प्रभावीपणे करता येते, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

जनगणना अधिकारी केवळ आवश्यक माहिती नोंदवतात. ते कोणतेही आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा इतर सरकारी कागदपत्र, बँक तपशील अथवा मोबाईल ओटीपी मागत नाहीत. नागरिकांनी दिलेली सर्व माहिती सुरक्षित आणि गोपनीय राखली जाते. त्यामुळे जनगणना कर्मचाऱ्यांना आवश्यक सहकार्य करून शहर विकासाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.